# पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६
दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२- २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईटwww.panvelcorporation.com

जा.क्र.पमपा/आस्था/२९२३/प्र.क्र.१३/७६५/२४ दिनांक:- ७ /०३/२०२४.

**विषय: शारीरिक चाचणी (मैदानी क्षमता चाचणी) करीता उपस्थित अग्निशमन सेवेतील उमेदवारांचे गुण संकेतस्थळावर फेर प्रसिद्ध करणेबाबत.**

पनवेल महानगरपालिका सरळसेवा पदभरती २०२३ अंतर्गत अग्निशमन सेवेतील उमेदवारांचे माहे डिसेंबर २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेत प्राप्त गुणानुक्रमानुसार व मंजूर सेवा प्रवेश नियमानुसार १:७ प्रमाणात पात्र उमेदवारांची १०० गुणांची शारीरिक चाचणी (मैदानी क्षमता चाचणी) दि.२७/०२/२०२४ व दि.२८/०२/२०२४ रोजी कर्नाळा स्पोर्टस ॲकेडमी, पनवेल येथे घेण्यात आली आहे.

दि.२८/०२/२०२४ रोजी जे उमेदवार एकापेक्षा अधिक पदांकरीता शारीरिक चाचणीसाठी उपस्थित होते त्या उमेदवारांची शारीरिक चाचणी एकदाच घेण्यात आली. अशा उमेदवारांना ते ज्या पदांकरीता उपस्थित होते त्या सर्व पदांकरीता गुण देणे आवश्यक होते तथापी संगणक आज्ञावलीतील तांत्रिक बाबीमुळे सदर उमेदवारांचे गुण फक्त एकाच पदाकरीता दर्शविण्यात आले होते. अशा उमेदवारांच्या गुणांची नोंद घेऊन शारीरिक चाचणीत उपस्थित असलेल्या उमेदवारांना शारीरिक चाचणीत प्राप्त गुणांचा फेर तक्ता याव्दारे महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

शारीरिक चाचणी (मैदानी क्षमता चाचणी) मध्ये प्राप्त गुण ऑनलाईन परिक्षेत मिळालेल्या गुणात अधिक करुन सामाजिक, समांतर आरक्षण व समान गुण असलेल्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी विचारात घेऊन गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

(गणेश देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
पनवेल महानगरपालिका